सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) पांढरकवडा यांचे कार्यालय
प्लॉट क्र.१२, शास्त्री नगर, पांढरकवडा ४४५३०२

दुरध्वनी क्र.०७२३५-२२७५२०
Email :- dfowlpand@gmail.com

## ई - निविदा सूचना क्र. 03 /2019-20

विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) पांढरकवडा यांचे वतीने खालील कामासाठी योग्य त्या वर्गातील पंजीबध्द मजुर कामगार सहकारी संस्था कडुन ई-निविदा प्रणाली द्वारे निविदा मागविण्यात येत आहेत. त्यामधील कामाचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्रं. | कामाचे नांव | कामाचे ठिकाण | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम रुपये (1%) | काम करण्याची कालमर्यादा | को-या निविदा नमुन्याची किंमत रुपये | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Repairing and strenthning of existing Murum Road (From sunna gate to shikari road 4.10 km ) in tipeshwar wildlife sanctuary | टिपेश्वर | 1583149 | 15831 | 15 दिवस | 590/- | शासकिय नियमा प्रमाणे |
| 2 | Repairing and strenthning of existing Murum Road (From maregaon chaufully to rest house 4.00 km) in tipeshwar wildlife sanctuary | टिपेश्वर | 1545828 | 15458 | 15 दिवस | 590/- | शासकिय नियमा प्रमाणे |

ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा भरणेची दिनांक , निविदेचा नमुना, निविदेसंबंधी ईतर तपशील खालील प्रमाणे देण्यात आलेला आहे.

1. कामाची सविस्तर निविदा सुचना व कोरे निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन दि. 17/03/2020 ते 23/03/2020 पर्यंत सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत भरता येतील.
2. निविदा दि. 24/03/2020 रोजी सायंकाळी 05.00 वाजता विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) , पांढरकवडा यांचे कार्यालय प्लॉट क्रं.12 शास्त्री नगर, पांढरकवडा येथे उघडण्यात येतील. निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) पांढरकवडा यांनी राखुन ठेवला आहे.
3. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) पांढरकवडा यांनी राखुन ठेवला आहे व त्यांचा निर्णय सर्व निविदा धारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.
4. निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती www.mahatenders.gov.in व www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर दिनांक 17/03/2020 ते 23/03/2020 पर्यंत पहावयास मिळेल.

**(सुभाष पुराणिक)**
**विभागीय वनअधिकारी**
**(वन्यजीव) पांढरकवडा**

## ई-निविदा संबंधी अटी व शर्ती :-

1. निविदा फॉर्म फी व अनामत रक्कमेचा भरणा Online Banking प्रणाली द्वारे करावा. प्रत्येक कामासाठी वेगळा निविदा फार्म व अनामत रक्कम भरणे गरजेचे राहील.
2. निविदेच्या अटी व शर्तीसह सविस्तर निविदा सुचना महाराष्ट्र शासनाचे http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहायला मिळेल.
3. मजुर सहकारी संस्था ही महाराष्ट्र शासनाचे सहका र विभागाकडे / जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे नोंदणीकृत असावी किंवा सक्षम शासकीय प्राधिकरणाव्दारे नोंदणीकृत असावा. मजुर सहकारी संस्थानी ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा भरताना पंजीकरण प्रमाणपत्र , मागील ३ वर्षाचा आयकर भरल्याचे प्रमाणपत्र , विक्रीकर/ वॅट / GST नोंदणी प्रमाणपत्राची छायाप्रत ना देय ( Clearance) प्रमाणपत्रासह, व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र ना देय (Clearance) प्रमाणपत्रासह जोडणे बंधनकारक राहिल.

4. ग्रामविकास व जलसंधारण विभाग , शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१०/२७५/प्र.क्र.१७२/पंरा-७/मंत्रालय मुंबई-४०००३२ दिनांक १९ ऑक्टोंबर २०११ अन्वये मान्यताप्राप्त नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थांना पतदारी प्रमाणपत्र देण्याच्या अटितून सूट देण्यात येत आहे . मात्र संबंधीत जिल्हा सहकारी संस्थाकडून , सदर निविदेमधील रक्कमेचे काम करण्याची आर्थिक पात्रता आहे असा दाखला मजूर सहकारी संस्थांनी सादर करणे आवश्यक आहे.

5. मजुर कामगार सहकारी संस्था ही यवतमाळ जिल्हयातीलच असावी.
6. मजुर कामगार सहकारी संस्थानी कायमचा पत्ता, पॅन कार्डची प्रमाणित छायांकीत प्रत जोडण्यात यावी.
7. सादर करण्यात येणारे प्रस्तावातील दर सर्व करासह अंतीम स्वरुपाचे असावे.
8. अटीयुक्त निवीदा स्विकृत करता येणार नाही.
9. महाराष्ट्र शासनाचे कामगार विषयक कायद्याच्या व नियमांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.
10. कामा दरम्यान कोणतीही जिवित/वित्त हानी झाल्यास त्यास वन विभाग जबाबदार राहणार नाही त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत मजुर कामगार सहकारी संस्थाची राहील. तसेच कामा दरम्यान कोणतेही शासकिय मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी. तसे झाल्यास शासकीय नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.
11. कामे अर्धवट स्वरुपात टाकुन दिल्यास केलेल्या कामाची कोणतीही रक्कम दिली जाणार नाही. अथवा परस्पर दुस-या मजुर कामगार सहकारी संस्थेस कामे हस्तांतरीत करता येणार नाही. मात्र सदरहु कामे पूर्ण करण्यास या विभागास दुस-या कंत्राटदारास द्यावी लागल्यास व अशा वेळी मंजूर निविदेपेक्षा जास्त खर्च झाला तो आपल्याकडुन वसुल करण्यांत येईल.
12. मजुर कामगार सहकारी संस्था यांनी यापुर्वी केलेल्या तत्सम कामाबाबतचे , शासकिय विभागाचे सक्षम अधिका -यांचे अनुभव प्रमाणपत्र कामाच्या यादीसह सादर करावे.
13. कामाची सविस्तर माहिती , अटि व शर्ती करिता तसेच अंदाजपत्रकीय व इतर माहिती करिता यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस सोडुन) उपलब्ध होवू शकेल.
14. निविदा मंजुर झाल्यानंतर मजुर कामगार सहकारी संस्था यांनी सदरचे काम विहित मुदतीत पुर्ण करण्याबाबतचे नियोजनाचे विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) पांढरकवडा यांचेकडे सादरीकरण करणे बंधनकारक आहे.
15. निविदा सादर करण्यापूर्वी कंत्राटदाराने स्थळाला भेट देऊन वास्तविक स्थितीची पाहणी करुनच निविदा सादर केलेली आहे, असे गृहीत धरण्यात येत असुन अंदाजपत्रकात कार्यारंभ आदेशाच्या वेळी किंवा काम सुरु असतांना चे दरम्यान कोणतीही वाढ अथवा बदल करता येणार नाही.

16. निविदा स्विकृत झाल्याबाबत लेखी कळवताच पाच दिवसांचे आंत मजुर कामगार सहकारी संस्थेस त्यांचे मंजुर निविदा रक्कमेच्या आधारे योग्य त्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करावा लागेल. स्टॅम्प पेपरचा खर्च संबंधित कंत्राटदाराचा असेल.

17. कामे सुरु असतांना कामाच्या नोंदी प्रमाणित केलेल्या मापनपुस्तिकेत ( M.B.Register) दर्शवुन त्याची वेळोवेळी तपासणी सक्षम अधिकाज्या मार्फत केल्या जाईल व त्यांचे योग्यते बाबतचे निरीक्षण अहवाला नुसारच कामाच्या रक्कमेचे संवितरण करण्यात येईल.

18. या कार्यालयाचे निवीदा स्विकृत झाल्याबाबतचे पत्र प्राप्त झाले नसल्यास संबंधितांची निविदा रद्द झालेली आहे , असे गृहीत धरण्यात यावे.

19. कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे किंवा स्विकारण्याचे व अटी व शर्तीमध्ये बदल करण्यांचे अधिकार विभागीय वनअधिकारी (वन्यजीव), पांढरकवडा यांनी राखुन ठेवले आहेत.

20. नोंदणीकृत मजुर कामगार सहकारी संस्थेने अधिकृत डिजीटल स्वाक्षरी प्राप्त करुन घेवुन महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा सादर करावी.

21. बयाणा अग्रिम परत देण्यांची तरतुद नाही.

22. सदर कामाची उणीवांच्या दुरूस्तीचा कालावधी (Defect liability period) शासन निर्णय क्रमांक सार्वजनिक बांधकाम विभाग, संकीर्ण-2018/प्र.क्र.151/इमारती-2, दिनांक 14.01.2019 अन्वये निर्धारीत आहे.

23. कामाचे देयकामधुन शासनाचे नियमानुसार अनुज्ञेय कपात जसे आयकर (अधिभारासह) , स्वामीत्व शुल्क (Royalty), विमा, सुरक्षाठेव इत्यादी कपात करण्यात येईल.

24. सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये GST समाविष्ठ आहे याची कंत्राटदाराने नोंद घ्यावी.

25. मजुर कामगार सहकारी संस्थेस सदर कामासाठी लागणारे तांत्रिक मनुष्यबळ (अभियंता) व यंत्रसामुग्री असणे आवश्यक आहे. त्यासंबंधी मनुष्यबळ व यंत्र सामुग्रीची यादी जोडावी.

26. कामाचे टप्पानिहाय समांतर मूल्यमापन , सक्षम व प्राधिकृत त्रयस्थ यंत्रणेमार्फत किंवा वनपरिक्षेत्र अधिकारी मार्फत करण्यात येईल आणि त्या यंत्रणेच्या प्रमाणपत्रानुसार झालेल्या तसेच क्षेत्रीय स्तरावरुन कामाच्या पुर्णत्वाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच अंतिम देयके अदा करण्यात येतील.

27. कार्यारंभ आदेशापासुन ठरलेल्या मूदतीत काम पूर्ण न झाल्यास प्रतिदिवस प्रमाणे दंड आकारण्यात येईल. दंड आकारणी ठरविण्याचे अधिकार विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) , पांढरकवडा यांचेकडे राखीव असतील.

28. कामाचा कार्यारंभ आदेश हा निधी उपलब्धतेवर अवलंबून राहील. सदर आदेश हे कामाची निविदा सक्षम अधिकारी यांचे कडुन मंजुर झाले नंतर देण्यात येईल.

29. निविदा दरात समान दर आल्यास त्याबाबतचे अंतीम निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार विभागीय वनअधिकारी (वन्यजीव), पांढरकवडा यांनी राखून ठेवले आहेत. तसेच इतर तांत्रीक व प्रशासकीय अडचणीत/वाद उद्भवल्यास त्याबाबतचे अंतीम निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक पेंच व्याघ्र प्रकल्प,नागपुर यांनी राखून ठेवले आहेत.

30. सदर कामे राखीव वनातील असल्यामुळे कंत्राटदाराने भारतीय वन अधिनियम ,१९२७ , वन्यजीव संरक्षण अधिनियम,१९७२ व वन संवर्धन अधिनियम ,१९८० चे उल्लंघन केल्यास नियमानूसार कार्यवाही करण्यात येईल.

**31.** सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2/मंत्रालय मुंबई/दि.26नोव्हेंबर 2018.

**1)** दिनांक 27.09.2018 च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र . 4.6 व मुद्दा क्र. 5.1.1 नुसार अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit ), निविदेच्या लिफाफा क्र . 2 मध्ये सादर करण्याबाबतच्या सुचना वरील परिपत्रकाव्दारे रद्द करण्यात येत असुन लिफाफा क्र .1 व लिफाफा 2 उघडल्यानंतर

प्रथम न्यूनतम देकार सादर करण्याऱ्या L1 निविदाधारकाने Additional Performance Security Deposit आठ दिवसाच्या आंत विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) कार्यालय पांढरकवडा यांचेकडे जमा करण्यात यावा व निविदेबाबत पुढील कार्यवाही करावी. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असणार नाही.

**2)** प्रथम न्यूनतम दे काराच्या L1 निविदाकाराने वरील विहित मुदतीत (Additional Performance Security Deposit) चा भरणा केला नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या L2 निविदाकार L1 पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजूर करण्यात येईल.

**3)** दिनांक 27.09.2018 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.4.6.3 (ब) मध्ये खालीलप्रमाणे नमद आहे.

"देकार 15% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डीडी व्दारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा. 19% कमी दराकरीता (19-15=4)%x2=8%"

ऐवजी

देकार 15% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डीडी व्दारे सादर करणे अनिवार्य राहील.

उदा. 19% कमी दरासाठी खालीलप्रमाणे पृथ:करण :-

10% कमी दरापर्यंत 1% व

15% पर्यंत कमी दरापर्यंत - (15%-10%=5%)

तसेच (19-15)=4% करीता (4x2)= 8%

असे एकूण (1+5+8) = 14%

31.सदर कामाचे वेळी वनाधिका-यांच्या सुचनेचे/निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

**(सुभाष पुराणिक)**
**विभागीय वनअधिकारी**
**(वन्यजीव) पांढरकवडा**